# शासकीय अध्यापक महाविद्यालय

# प्रथम वर्ष स्वागत समारंभ आणि प्राचार्य अभिभाषण कार्यक्रम

# अहवाल

7 ऑक्टोबर 2024 रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालयात बीएड प्रथम वर्षाच्या स्वागत समारंभाचा आणि प्राचार्य अभिभाषणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला सदर. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले होत्या. तसेच कार्यक्रमाच्या मार्गदर्शक महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका सन्माननीय बिजली दडपे होत्या. कार्यक्रम सोहळ्याचे आयोजक द्वितीय वर्ष छात्र अध्यापक यांनी बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते..सरस्वती कक्षामध्ये कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली, ज्यामध्ये महाविद्यालयाचे प्रमुख आणि प्राध्यापक वृंदांनी सहभाग घेतला. यानंतर द्वितीय वर्षातील  प्रशिक्षणार्थी यांनी परिपाठ घेवून या शुभ दिवसाची सुरुवात केली . द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी यांनी सुरेल स्वागत प्रस्तुत केले. गीत गायनाने कार्यक्रमामध्ये सकारात्मक आणि उत्साही वातावरण तयार झाले.

प्राचार्या माननीय डॉ. रमा भोसले यांचे औपचारिक स्वागत ज्येष्ठ प्राध्यापिका माननीय बिजली दडपे यांनी केले, तर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंदांचे स्वागत द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थी यांच्या हस्ते झाले.. यानंतर माननीय बिजली दडपे मॅडम यांनी प्रास्ताविक करून त्यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांचे आणि शिक्षणाच्या महत्त्वाचे विवेचन करत, नव्या प्रशिक्षणार्थींचे  स्वागत केले.

प्राचार्या डॉ. रमा भोसले यांनी आपल्या अभिभाषणात बीएड अभ्यासक्रमाचे महत्व स्पष्ट केले. त्यांनी प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शिक्षण प्रवासात मूल्यशिक्षण, व्यक्तिमत्व विकास, आणि विद्यार्थ्यांसाठी योग्य दिशादर्शनाची महत्त्वपूर्णता यावर भर दिला. त्यांनी सांगितले की, "शिक्षक म्हणून प्रत्येकाने केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याची आणि समाजाच्या बांधिलकीची जबाबदारीही पार पाडली पाहिजे." त्यांच्या भाषणात नवीन छात्राध्यापकांसाठी प्रेरणादायी विचार आणि भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठीचे काही उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी आणि आकर्षक सूत्रसंचालन द्वितीय वर्षातील छात्राध्यापक सायली जाधव यांनी केले.

बीएड प्रथम आणि द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थ्यांमध्ये परस्पर संवाद साधण्यासाठी एक विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये विविध गटांमध्ये विद्यार्थी एकत्र आले आणि त्यांनी आपापसात मैत्रीपूर्ण संवाद साधला. हा उपक्रम एकत्रित कार्यसंस्कृतीला चालना देण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत यशस्वी ठरला. नंतर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.रमा भोसले तसेच इतर प्राध्यापक वृंद यांनी त्यांचा परिचय करून दिला .कार्यक्रमाच्या शेवटी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते, ज्यानंतर राष्ट्रगीत ‘वंदे मातरम्’च्या गायनाने या उत्साही आणि प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कार्यक्रमादरम्यान टिपलेली क्षणचित्रे












**प्रथम द्वितीय वर्ष छात्राध्यापकांचा परिचय कार्यक्रमांमध्ये टिपलेले क्षणचित्र**


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4Q8+FQC, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988855°
Long 73.116942°
07/10/24 01:09 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4Q8+FQC, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988873°
Long 73.116891°
07/10/24 01:13 PM GMT +05:30
Google


पनवेल.
GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4Q8+FQC, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.988903°
Long 73.116857°
07/10/24 01:14 PM GMT +05:30
Google